या जागेसाठी जाहिरात घेणे आहे...
:: संपर्क ::
मो : 9730262660

सायं.दैनिक
आवाज जनसामान्यांचा..
बीड किसान
• संपादक : शेख कामरान •

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे...
:: संपर्क ::
मो : 9730262660

बीड ▪ वर्ष ४ ▪ अंक २३७ ▪ शुक्रवार, दि. १० जानेवारी २०२५ ▪ पोस्टल दिनांक ११ जानेवारी २०२५ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.
BEED ▪ Year-4 ▪ Issue-237 ▪ Friday 10 January 2025 ▪ Postal Date 11 January 2025 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

गुटखा बंदीसाठी फांद्यावर घाव का? सरळ बुडच तोडून टाका

गोर गरीबांच्या टपऱ्यांवर गुटखाच्या कारवाया करुन आपली बहादुरी दाखवीणाऱ्या खाकीने डिलरवर धाड टाकण्याची हिमत दाखवावी!

एसपी साहेब...तुम्हाला करवाया दाखवण्यासाठी गोर गरीबांचा बळी!

बीड । किसान न्युज

अवैध गुटखा विक्री रोखण्यासाठी पोलिसांनी धडक कारवाईला सुरुवात केली आहे. मात्र ही कारवाई करत असताना पोलिसांनी छोट्या छोट्या टपऱ्यावाल्यांना टार्गेट केले असून, मोठमोठे डीलर तसेच मोकाट सोडून दिले आहेत. एसपी साहेबांना आपण केलेल्या कारवाया दाखविण्यासाठी पोलीस थातूरमातूर कारवाया करीत असून, हिम्मत असेल तर डीलरला रोखून दाखवावे, अशी चर्चा जनसामान्यातून होत आहे. बीड मधील पोलिसांना गुटख्याच्या डीलर कडून लाच खायची सवय लागली असल्याने, ते त्यांच्यावर कारवाई करीत नाहीत मात्र साहेबांची मर्जी राखण्यासाठी लहान लहान टपरीधारकांना पकडले जात असल्याचे दिसते. पोलिसांना खरंच जिल्ह्यातील गुटखा बंद करायचा असेल तर छोट्या छोट्या फांद्या तोडण्यापेक्षा सरळ मुळावरच घाव घालावा, अशी अपेक्षा व्यक्त होताना दिसत आहे.

नव्याने दाखल झालेले बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी अवैध धंदे रोखण्यासाठी पोलिसांना कडक वॉर्निंग दिली आहे. जिल्ह्यामध्ये सुरू असलेले सगळे अवैध धंदे बंद करावेत आणि त्यांच्यावर कठोर कारवाई करावी असे पोलीस अधीक्षकांनी आदेशित केले आहे. ज्यांच्या एरियामध्ये अवैध धंदे सुरू असतील त्या पोलिसांची गय केली जाणार नाही असेही एसपी साहेबांनी बजावले आहे. त्यामुळे पोलीस कामाला लागले आहेत मात्र आपले संबंध जोपासित पोलीस कारवाई करताना दिसतात. अवैध गुटख्याच्या बाबतीत हे सरळपणे जाणवत आहे. पोलीस सध्या छोट्या छोट्या टपरी धारकांना धरत असून त्यांच्यावर कारवाई करीत आहेत. सोबतच टपरी धारकांना मारझोडही केली जात आहे. आपण अवैध धंद्याच्या किती विरोधात आहोत हे भासविण्याचा पोलिसांचा प्रयत्न दिसतो आहे. ही कारवाई करीत असताना पोलिसांनी गुटख्याचे जे डीलर आहेत त्यांना मोकाट सोडले आहे. अद्याप पर्यंत एकाही मोठ्या डीलरवर कारवाई झालेली नाही. गुटखा कुठून येतो, तो कोण आणतो आणि कुठे जातो याची सगळी माहिती पोलिसांना आहे. मात्र पोलीस त्याच्यावर कारवाई करीत नाहीत. छोट्या छोट्या टपरीवाल्यांना पकडायचे आणि आपण किती मोठी कामगिरी केली असे भासवायचे अशा पद्धतीने पोलिसांचे काम सुरू आहे. म्हणजे एसपी साहेबांना अंधारात ठेवून पोलीस थातूरमातूर कारवाई करताना दिसतात. पोलिसांना खरंचच जिल्ह्यातील गुटखा रोखायचा असेल तर छोट्या छोट्या फांद्यावर घाव घालीत बसण्यापेक्षा सरळ त्याचे मूळच का तोडून टाकले जात नाही? एकीकडे एसपी साहेबांची मर्जी राखायची आणि दुसरीकडे डीलरलाही खुश ठेवायचे अशा पद्धतीने पोलिसांची कारवाई सुरू असल्याचे दिसते. पोलिसांकडे हिम्मत असेल तर त्यांनी थेट डीलरवर कारवाई केली पाहिजे आणि जिल्ह्यामधील गुटखा बंदी अमलात आणली पाहिजे. आता एसपी साहेबांनी पोलिसांच्या कारवाईकडे लक्ष घालून ते कुठे आणि कशी कारवाई करतात हे तपासावे आणि यातील सूत्रधार का पकडले जात नाहीत » पान २ वर

टपरीवाले गुटख्याचे उत्पादक नाहीत, त्यांच्यापर्यंत माल जातोच कसा?

जिल्ह्यामध्ये विविध मार्गाने गुटखा दाखल होतो. यासाठी डीलरची स्वतंत्र यंत्रणा उभारली गेली आहे. अशा बाहेरून येणाऱ्या गुटख्याला संरक्षण कोणाचे असते ? पोलिसांच्या नजरेतून हा गुटखा सुटतोच कसा अन तो टपरीवाल्यापर्यंत पोहोचतोच कसा ? विकणारे टपरीवाले दोषी आहेतच मात्र त्यांच्यापर्यंत गुटखा पोहोचविणारे नुसते दोषीच नाही तर गुन्हेगार आहेत. सगळ्यात अगोदर यांच्यावरच कारवाई झाली पाहिजे. गुटखा हा टपरीवाल्यापर्यंत पोहोचण्यापर्यंत पोलीस झोपा काढत आहेत काय? टपरीवाल्याजवळ गुटखा पोहोचल्यानंतर त्याची विक्री होते आणि मग पोलीस त्याच्यावर कारवाई करताना दिसतात मात्र पोलिसांनी त्या अगोदरच कारवाई केली तर टपरी वाल्याचा संबंधच येणार नाही. पण डीलरशी लागेबांधे असल्याने पोलीस असे करत नाहीत.

ना.पंकजा मुंडे मंत्री झाल्या नंतर पहिल्यांदाच परळीत

यशःश्री निवासस्थान येथे मतदारसंघातल्या लोकांच्या भेटी घेतल्या

परळी वै. । किसान न्युज

राज्याच्या पर्यावरण, वातारणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचे मंत्री झाल्यानंतर प्रथमच शहरात आगमन झाले,त्यांना भेटून समस्या मांडण्यासाठी यशःश्री निवासस्थान अक्षरशः गर्दीने फुलून गेले होते. ना. पंकजाताईंनी प्रत्येकाला वैयक्तिक भेटून त्यांची गाऱ्हाणी ऐकली व त्यांच्या प्रश्नांचा जागेवरच निराकरण केले. ना. पंकजाताई मुंडे यांचे बुधवारी रात्री उशीरा शहरात आगमन झाले. मंत्री झाल्यानंतर प्रथमच आल्या तरी कुठलाही गाजावाजा, मोठा सत्कार करू नये अशा सूचना त्यांनी कार्यकर्त्यांना केल्या होत्या. आज सकाळपासूनच यशःश्री निवासस्थानी त्यांना भेटण्यासाठी जिल्हयातील तसेच जिल्हया बाहेरून नागरिक व कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. आलेल्या प्रत्येकांना भेटत, त्यांची गाऱ्हाणी ऐकून घेत त्यांनी जनतेच्या समस्यांचे जागेवरच निराकरण केले. लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे » पान २ वर

जातीयवाद वाढवून बीड जिल्ह्याला आणि

राजकीय नेतृत्वाला बदनाम करु नका : मोईन मास्टर

गुन्हेगारांना सोडू नका, सगळ्यांना शोधा आणि फाशी द्या : मोईन मास्टर

बीड । किसान न्युज

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या ही माणुसकीला आणि अखंड मानव जातीला काळीमा फासणारी आहे. या प्रकरणातील एकाही गुन्हेगाराला सोडू नका, सगळ्यांना शोधा आणि फाशी द्या अशी मागणी बीड येथील ज्येष्ठ समाजसेवक मोईन मास्टर यांनी केली आहे. मात्र गेल्या एक महिन्यापासून या निंदनीय घटनेच्या आडून ज्या पद्धतीने जिल्ह्यात मराठा आणि वंजारा समाज असा जातीय भेद केला जात आहे तो अतिशय गंभीर आणि दोन्ही समाजासाठी घातक आहे. या जातीयवादातून दिवसेंदिवस एकमेकाविरुद्धचा द्वेष वाढू लागला आहे. या घटनेचा वापर राजकीय ढाल आणि जातीयवादाचे विष पेरण्यासाठी होऊ नये ही सर्वांचीच अपेक्षा आहे. केवळ एकाच समाजाला टार्गेट करणे आणि जिल्ह्याचे नेतृत्व संपवण्याचा प्रयत्न करणे कितपत योग्य आहे असा प्रश्न जेष्ठ समाजसेवक मोईन मास्टर यांनी उपस्थित » पान २ वर



आजी-माजी आमदारांना आताच जातीवाद कसा आठवला?

बीड जिल्ह्यात काही आजी - माजी आमदार सद्या ओबीसी - मराठा असा भेदभाव करतांना दिसत आहेत. मात्र बीड आणि माजलगावमध्ये मराठा आरक्षण आंदोलनाच्या दरम्यान घडलेल्या घटनांचा विसर पडला आहे. बीडमध्ये ज्या आमदारांच्या घरात जाळपोळ झाल्याची घटना घडली, त्यावेळी मुस्लिम समाजातील काही लोकांनी त्यांच्या कुटुंबीयांना सुखरूप बाहेर काढले. त्यावेळी जीव वाचविणाऱ्या लोकांनी जात किंवा धर्म पाहिला नाही.मात्र तेच आमदार आज ओबीसी - मराठा असा भेदभाव करून मस्साजोग येथील घटनेच्या आडून एका राजकीय नेतृत्वावर जातीच्या चष्म्यातून पाहत आहेत असेही मोईन मास्टर यांनी म्हटले आहे.

लग्न कर अथवा २० लाख दे अन्यथा आत्महत्या करणार

महिला पोलिसास धमकी; तरुणावर गुन्हा दाखल

माजलगाव । किसान न्युज

महिला पोलिसाशी झालेल्या ओळखीतून एका तरुणाने तिच्याशी लग्न करण्याचा हट्ट धरत लग्नासाठी दबाव टाकला. लग्न न केल्यास चिठ्ठीत नाव लिहून आत्महत्येची धमकी दिली. त्यानंतर २० लाखांची मागणी केली. जातिवाचक शिवीगाळ केली. माजलगाव शहरात हा प्रकार घडला. या प्रकरणी माजलगाव शहर पोलिसांत गुन्हा नोंद करण्यात आला. महिला पोलिसाच्या तक्रारीनुसार, त्या सध्या माजलगाव शहर पोलिस ठाण्यात कार्यरत आहेत. पूर्वी त्या माजलगाव तालुक्यातीलच दुसऱ्या पोलिस ठाण्यात कार्यरत होत्या. त्यावेळी त्यांची ओळख बाळासाहेब विश्वनाथ सोनटक्के (रा. तेलगाव, ता. धारुर) या » पान २ वर

महिना झाला तरी मस्साजोगमध्ये सुतकच सीडीआर नुसार आरोपी पकडण्याची मागणी

दोन दिवसात एसपींचा अल्टिमेट संपवतोय नंतर गाव निर्णय घेणार

बीड । किसान न्युज

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाला काल महिना झाला. तरीही गावात सुतकच असून, दोन दिवसांत एसपींनी दिलेलं अल्टिमेट संपवतोय यानंतर काय करायच? याचा निर्णय गाव बसून घेणार आहे. सीडीआर प्रमाणे आरोपी पकडण्यात यावे अशी मागणी ग्रामस्थ करीत असून एका वृत्तवाहिनीशी बोलताना सांगितले. केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्येचा घटनेला गुरुवारी (दि.९) महिना झाला. याचे पडसाद राज्यभर उमटत आहेत. या धक्क्यातून गाव आणखी बाहेर आले नसून आजही सर्व गाव तेथील मंडपामध्ये बसत आहे. पंधरा वर्षांपासून ज्या माणसाने तळहातावरील फोडा प्रमाणे गावाला जपलं त्याच प्रमुखाला काहींनी हिरावून घेतले आहे. यामुळे महिना झाला तरी गावात सुतक कायम आहे. यापूर्वी आरोपींच्या अटकेसाठी जलसमाधी घेण्याचा निर्णय घेत गाव तलावात उतरले होते. यावेळी एसपी नवनीत कॉवत यांनी १० दिवसांची वेळ मागून घेतली होती. यावेळेत त्यांनी फरार तीन पैकी सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे या दोघांना पुण्यातून अटक केली. परंतु कृष्णा आंधळे हा » पान २ वर

स्थानिक सोने चांदीचे भाव..
पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
9850643058
सोने २४ कॅरेट 79,700
२२ कॅरेट 77,500
चांदी प्रतिकिलो 92,000

डॉ.शेख फयाज (फतेहबादी)
DNYS, Acupuncture Practitioner
Registered by The Maharashtra Council of Acupuncture
Mob. 9028905215
7020353773
इम्फी युनानी आयुर्वेदिक शिफाखाना
ॲक्युपंक्चर / ॲक्युप्रेशर / हिजामा सेंटर
* बवासीर * डिप्रेशन * लकवा * कमर दर्द * स्त्री रोग * दमा (अस्थमा) * मोटापा
* गंजापन * त्वचा रोग * लिव्हर इन्फेक्शन * ब्लड प्रेशर * जोडो का दर्द * गुर्दे की पथरी * सियाटिका
* वात गठिया * पुरुषरोग * शुगर * थायरॉईड * एलर्जी * सरदर्द * गजकर्ण
राष्ट्रवादी भवन, अत्तार कॉम्प्लेक्स शेजारी, बार्शी रोड, बीड

रस्ता सुरक्षा सप्ताह निमित्त वाहन चालक-मालकांना मार्गदर्शन

बीड । किसान न्युज

रस्ता सुरक्षा सप्ताह निमित्त वाहन चालक-मिलकांना मार्गदर्शन करण्यात आले. हा कार्यक्रम आज पोलीस अधीक्षक कार्यालयात हा कार्यक्रम सकाळी पार पडला आहे. सडक सुरक्षा-जीवन सुरक्षा या हॅशटॅग खाली रस्ता सुरक्षा अभियान २०२५ सध्या राबविण्यात येत आहे. या अंतर्गत बीड जिल्हा पोलीस दल, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,बीड, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय,बीड यांच्या संयुक्त विद्यमाने वाहन चालक-मालक मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव श्री. सोनी, वाहतूक शाखेचे सपोनि सुभाष सानप, आरटीओ जाधव, ॲड. आनंद कुलकर्णी, ॲड. अमित रोकडे, वाहन चालक-मालक संघटनेचे विजय काकडे, बाबु अत्तार, शर्मा आदि उपस्थित होते. यावेळी मोठ्या प्रमाणात वाहन चालक,मालक उपस्थित होते.

बारावीचे हॉल तिकीट आज पासून ऑनलाईन उपलब्ध

बीड । किसान न्युज

बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाची बातमी आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्चमध्ये होणाऱ्या बारावीच्या परीक्षेची प्रवेशपत्र आजपासून म्हणजेच १० जानेवारी पासून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांना ही प्रवेशपत्र www.mahahsscboard.in या वेबसाइटवरून डाऊनलोड करता येणार आहेत. याशिवाय महाविद्यालयातून देखील प्रवेशपत्र घेता येणार आहे. दरम्यान, प्रवेश पत्रावर प्रचार्यांचा सही शिक्का घ्यावा लागणार आहे. त्याशिवाय परीक्षेला बसता येणार नाही. तसेच या संदर्भात काही तांत्रिक अडचणी आल्यास माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा, असे आवाहन राज्य मंडळाकडून करण्यात आले आहे.